दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२६ वा ● मंगळवार, ता. १० जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## फडणवीसांनी ओवाळली छत्रपती शिवाजी महाराजांची आरती



**मुंबई । प्रतिनिधी**

शिवराज्याभिषेक सोहळ्याचा थाटमाटात उत्सव साजरा करत कुर्ला येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज शिवरायांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून विधीवत आरती केली. या कार्यक्रमाला माजी खासदार पूनम महाजन यांच्यासह अनेक शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थिती लावली. जगप्रसिध्द ६ जूनऐवजी ठरवून तिथीनुसार ९ जूनला शिवराज्याभिषेक साजरा करत हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्त्रोत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृती जागवण्यासाठी महाराष्ट्रभर विविध कार्यक्रमांचे आयोजन काहीजणांकडून केले जाते. कुर्ल्यातील मंदिरात पार पडलेल्या या सोहळ्याचे आयोजन उत्साही वातावरणात झाले. मंदिरात साकारलेली छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मूर्ती, फुलांची सजावट आणि भक्तिमय वातावरणाने उपस्थित प्रत्येक शिवप्रेमी भारावून गेला. कार्यक्रमादरम्यान सांस्कृतिक सादरीकरणासोबतच ऐतिहासिक पार्श्वसंगीतही देण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात महाराजांच्या दूरदृष्टी, शौर्य आणि जनतेप्रती असलेल्या सेवाभावाचे स्मरण करून, युवकांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले.

# कृषि विकास केंद्राचा परिणाम शेतकऱ्यांच्या शेतावर किती होतो? याचा अभ्यास करण्याची वेळ- शरद पवार

### वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये चर्चासत्रात संकेत; कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऊस शेतीतील नवयुगाचा आरंभ



**पुणे । प्रतिनिधी**

ऊस उत्पादन, साखर कारखानदारी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) या विषयांवर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये ता. ९ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी शेती क्षेत्रातील तांत्रिक क्रांतीबाबत महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. शरद पवार यांनी स्पष्टपणे सांगितले की, AI हे ऊस शेतीतील गेम चेंजर ठरेल. योग्य वेळी पाणी, खत आणि मार्गदर्शन मिळाल्यास उसाचे उत्पादन आणि उत्पन्न दुप्पट होऊ शकते. या तंत्रज्ञानाचा वापर करून केवळ ऊसाचे उत्पादनच नव्हे, तर साखर, इथेनॉल आणि इतर उपपदार्थांची निर्मितीही वाढवता येईल, असे त्यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट आणि अन्य संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून, AI वापरासाठी प्रती हेक्टर २५,००० रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये शेतकऱ्यांकडून ९,०००, साखर कारखान्यांकडून ६,७५० आणि संस्थेकडून ९,२५० रुपये देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातील केंद्रांची पुनरावलोकन करण्याची गरज असल्याचा पवारांनी सुचक इशारा यावेळी दिला. पवारांनी कृषी विज्ञान केंद्रांच्या (KVK) कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत, शेतकऱ्यांच्या शेतावर KVK चा नेमका किती परिणाम होतो, याचा अभ्यास करण्याची वेळ आली आहे, असे मत व्यक्त केले. त्यांनी राज्यातील कृषी विद्यापीठांना आणि तज्ज्ञांना एकत्र करून धोरणात्मक निर्णय घेण्याचे आवाहन केले.ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, AI मायक्रोसॉफ्टचे प्रमुख डॉ. रणवीर चंद्रा आणि ८७ जागतिक शास्त्रज्ञांच्या सहकार्याने हा प्रकल्प साकार होत आहे, याचे समाधानही पवारांनी व्यक्त केले. सत्या नडेला आणि एलॉन मस्क यांचं यश AI मुळे शक्य झालं, तसं आपल्यालाही हे शक्य आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले. उत्तर प्रदेशातील बलरामपुर साखर कारखान्याच्या उदाहरणाचा उल्लेख करत, साखरेपासून कापड, पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिक आणि औषधे तयार करण्याच्या शक्यतांकडेही पवारांनी लक्ष वेधले. महाराष्ट्रातही असे प्रयोग व्हावेत, अशी त्यांची अपेक्षा. साखर कारखान्यांमधील कृषी अधिकाऱ्यांची भूमिका केवळ कापणी व वाहतूक व्यवस्थेपुरती मर्यादित असल्याची खंत व्यक्त करत, त्यांनी अधिकाऱ्यांना AI हवामान प्रणाली व पीक व्यवस्थापन यावर प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव मांडला. शरद पवार यांच्या नेतृत्वात साकार होत असलेल्या या क्रांतीकारक उपक्रमामुळे महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांसमोर नव्या आशा आणि संधी उभ्या राहत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शेतीमुळे शेतीचे स्वरूप बदलण्याची शक्यता अधिक स्पष्ट झाली आहे.

# २०० कोटींच्या गुलाबी जॅकेटसाठी महाज्योतीचा निधी पळवला?

### लक्ष्मण हाकेंचा गंभीर आरोप





**पुणे । प्रतिनिधी**

महाज्योतीसारख्या शिक्षणविषयक संस्थांचा निधी ओबीसी समाजाच्या कल्याणासाठी वापरला जावा, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. मात्र, या निधीचा वापर पीआर फर्मसाठी केला जातोय, असा गंभीर आरोप ओबीसी समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केला आहे.

हाके यांनी म्हटले, महाज्योतीच्या माध्यमातून मिळणारा पीएचडी फेलोशिप निधी वेळेवर विद्यार्थ्यांना दिला जात नाही. वसतीगृहे अर्धवट आहेत. यामागे सुमारे २०० कोटी रुपयांचा निधी 'डिजाईन बॉक्स' नावाच्या एका पीआर कंपनीकडे वळवण्यात आला आहे. त्यांनी आरोप केला की, हीच डिजाईन बॉक्स कंपनी सोशल मिडीयावर ओबीसी नेत्यांना बदनाम करण्याचं षडयंत्र रचते. आणि सारखी पेजेस या कंपनीच्या माध्यमातून चालवली जातात. हे पेजेस ओबीसी चळवळीचे नेते, हाके, पडळकर, भुजबळ आणि धनंजय मुंडे यांच्यावर टीका करतात. हाके पुढे म्हणाले, अजित पवारांना यामधून केवळ एक गुलाबी जॅकेट मिळालं. पण इमेज बिल्डिंग करूनसुद्धा ओबीसी जनतेने लोकसभा निवडणुकीत धडा शिकवला. बारामतीमध्येही पराभव पत्करावा लागला.

महायुतीला ओबीसी समाजाने मतदान केलं, हे विसरू नका, असा इशारा देत हाके यांनी मागणी केली की, ओबीसींसाठी समान निधी वितरित करून उपकारांची परतफेड करा.

# महिला सफाई कामगारांच्या हस्ते लोकार्पण
# १८.५० टन व ७ टन क्षमतेची सक्शन अँड जेटिंग वाहने मनपात दाखल



**अहमदनगर । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस शहराचा विस्तार होत आहे. लोकसंख्या वाढत आहे. त्याच प्रमाणात सेवा व सुविधांची मागणीही वाढत आहे. त्यासाठी महानगरपालिकेची सेवा व सुविधा पुरवणारी यंत्रणा बळकट असणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोनातून राज्य शासनाकडे पाठपुरावा करून शहरातील ड्रेनेज लाईन, चेंबरची तत्काळ व अधिक प्रभावीपणे साफसफाई होण्यासाठी महानगरपालिकेला अत्याधुनिक वाहने उपलब्ध करून दिली आहे. या वाहनांमुळे नागरिकांच्या तक्रारीवर तत्काळ कृती होऊन त्यांच्या समस्याही तत्काळ सोडवता येतील, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. आमदार जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यशासनाने उपलब्ध करून दिलेल्या सक्शन अँड जेटिंग वाहनांचे लोकार्पण आमदार जगताप व आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या हस्ते सोमवारी महानगरपालिकेत पार पडले. दोन वाहने उपलब्ध झाली असून, ७ टन क्षमतेच्या वाहनाचे लोकार्पण सफाई कामगारांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त संतोष टेंगळे, विजयकुमार मुंडे व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आमदार जगताप म्हणाले की, महानगरपालिका आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या समस्या सोडवते. मात्र, अनेकवेळा साधन सामग्री अथवा अद्ययावत मशिनरी नसल्यामुळे समस्या सोडवताना अडथळे येतात किंवा उपाययोजनांसाठी वेळ लागतो. त्यामुळे महानगरपालिकेची यंत्रणा अत्याधुनिक साहित्य, साधन सामग्रीसह सज्ज असणे आवश्यक आहे. त्यामुळे हे नवीन वाहन उपलब्ध करून देण्यात आले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या काळात निर्माण होणाऱ्या अडचणी, समस्या सोडवण्यासाठी याचा प्रभावीपणे वापर होईल, असा विश्वासही आमदार जगताप यांनी व्यक्त केला. यावेळी आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे म्हणाले, ड्रेनेज लाईन, चेंबर साफसफाईसाठी ही गाडी राज्य शासनाकडून आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. १८.५० टन क्षमतेच्या या वाहनात तीन प्रकाराच्या सुविधा उपलब्ध आहेत.

**दरम्यान, चारपाच महिने वापरलेल्या काही नव्या वाहनांचे लिलाव करून नवीन वाहने फुकूण टाकण्याची मोहिम मनपा प्रशासकाकडून सुरू असल्याची मनपात चर्चा आहे. आता या आलेल्या नव्या वाहनांचे पुढे काय होईल ? ही चिंता अहिल्यानगरकर करत आहेत.**

# कॅमेऱ्यामागचे कल्पक हात
# स्टोरीबोर्ड आर्टिस्ट गौरव सर्जेराव

**कलावार्ता । भैरवनाथ वाकळे**



चित्रकलेतून कथा सांगणाऱ्या आणि स्क्रीनवर दिसणाऱ्या प्रत्येक फ्रेमचा दृष्य आराखडा तयार करणाऱ्या स्टोरीबोर्ड आर्टिस्ट गौरव सर्जेराव यांची दहा वर्षांची उल्लेखनीय वाटचाल ही मराठी कला-जगतासाठी अभिमानाची बाब आहे. व्यंगचित्रकार आणि 'मार्मिक'च्या मुखपृष्ठांमुळे ओळख निर्माण झालेल्या सर्जेराव यांचा स्टोरीबोर्ड आर्टिस्ट म्हणून असलेला प्रगल्भ प्रवास अनेकांना नवीन माहिती देणारा आहे. ''स्टोरीबोर्ड म्हणजे नेमकं काय?'' यावर गौरव म्हणतात, ''हे प्री-प्रोडक्शनचं महत्त्वाचं पाऊल आहे. चित्रपट, ॲनिमेशनपट किंवा जाहिरात पूर्ण कशी दिसेल, याचा आराखडा आम्ही चित्ररूपात बनवतो. त्यामुळे संपूर्ण टीमला अचूक मार्गदर्शन मिळतं आणि वेळ व पैशाची बचत होते.'' सर्जेराव यांनी 'छोटा भीम', 'मोटू पतलू', 'लिटिल सिंघम' यासारख्या प्रसिद्ध ॲनिमेशन मालिकांसाठी तसेच 'गज्जू भाई', 'पाप ओ मीटर', 'बंटी और बिल्ली' यांसारख्या अनेक प्रोजेक्टसाठी स्टोरीबोर्ड तयार केले आहेत. त्यांच्या मते, ॲनिमेशनमध्ये स्टोरीबोर्ड आर्टिस्ट दिग्दर्शकासारखा महत्त्वाचा असतोदृष्यदृष्टिकोन, अभिनय, फ्रेम कंपोजिशन, लाइटिंग, टाइमिंग या सर्व बाबींचं नियोजन त्याच्या हातात असतं. ''१८ व्या वर्षी मी या क्षेत्रात पाऊल ठेवलं. सुरुवातीला चार वर्षे नोकरी केली, मग स्वतः चं ब्रेवन स्टुडिओ सुरू केलं. कल्पकतेसोबतच संयम आवश्यक असतो. शेकडो फ्रेम्स रेखाटणं हे सोपं नाही, पण मनापासून केल्यावर मजा येते!'' - असे गौरव सांगतात. सर्जेराव यांनी हिंदी व मराठी जाहिरातींसाठीही स्टोरीबोर्ड बनवले आहेत. दोन मराठी चित्रपटांसाठीही त्यांनी हे काम केलं आहे. मात्र भारतात अजूनही स्टोरीबोर्डिंगकडे गंभीरतेने पाहिलं जात नाही, हे ते स्पष्टपणे नमूद करतात. ''हॉलीवुडमध्ये स्टोरीबोर्ड आर्टिस्ट आवश्यकच असतो. आपल्याकडेही तशी संधी मिळावी, असं वाटतं.'' सध्या सर्जेराव लाईव्ह ॲक्शन चित्रपटांमध्ये अधिक काम करण्याची संधी शोधत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ''आपल्या देशातील चित्रपटांसाठी स्टोरीबोर्ड तयार झाले, तर त्याचा दर्जा निश्चितच उंचावेल.'' अखेरीस गौरव सर्जेराव यांचं आवाहन, ''चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि संकल्पनाकारांनी स्टोरीबोर्ड आर्टिस्टची गरज ओळखावी. मी तुमच्यासोबत काम करण्यास उत्सुक आहे!'' कलेच्या माध्यमातून पडद्यामागील नियोजन साकार करणारे गौरव सर्जेराव हे खऱ्या अर्थाने 'दृश्यकथेचे शिल्पकार' आहेत.

# मुंबईच्या समुद्रात सौर दिशानिर्देशक

### सुरक्षिततेसह पर्यावरण संवर्धनाची जोड

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

गणेशोत्सव तसेच नवरात्रोत्सवात अनेकजण खोल समुद्रात मूर्ती विसर्जनासाठी जातात. यात अपघाताचा धोका असतो. शिवाय, नंतर मूर्ती पाण्यातून काढतानाही अडचणी येतात. यावर तोडगा म्हणून मुंबई महापालिकेने समुद्रातील ओहोटी रेषेजवळ मरिन नेव्हिगेशन बॉयज (दिशानिर्देशक) बसवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कुठपर्यंत विसर्जन करावे, हे चिन्हांकित होणार आहे. परिणामी, अगदी खोल समुद्रात विसर्जन करता येणार नाही. मुंबई महापालिकेच्या पर्यावरण विभागाने ही यंत्रणा बसवण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर गणेशमूर्ती आणि देवीच्या मूर्तींचे विसर्जन केले जाते. मोठ्या मूर्तींच्या विसर्जनासाठी अनेकजण खोल समुद्रात जातात. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण होतो. शिवाय, विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी त्या मूर्ती बाहेर काढण्यासाठीही बरीच खटपट करावी लागते. अनेक वेळा ओहोटी झाल्यावर मूर्ती चौपाट्यांवर विखुरलेल्या आढळतात, तर काही मूर्ती खोल समुद्रातच राहतात. त्यामुळे ओहोटी व भरती रेषांदरम्यान विसर्जनाचे क्षेत्र निश्चित करून त्याठिकाणी दिशानिर्देशक बसवण्यात येणार असल्याची माहिती पर्यावरण विभागाने दिली आहे. यामुळे एका ठराविक अंतरापर्यंतच विसर्जन करता येणार आहे. परिणामी, दुसऱ्या दिवशी समुद्रातून १०० टक्के मूर्ती सहज बाहेर काढणे शक्य होणार असल्याचे महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. सदर दिशानिर्देशकांवर सौर दिवेही बसवले जाणार आहेत, जेणेकरून विसर्जन करणाऱ्यांना ते स्पष्टपणे दिसतील. या कामासाठी महापालिकेने निविदाही काढली आहे. एकूण ४३ ठिकाणी ही नवी दिशादर्शक यंत्रणा बसवण्यात येणार आहे. पर्यावरणाच्या हानीला आळा घालणे हाही यामागचा उद्देश आहे. ही संपूर्ण यंत्रणा केंद्र शासनाच्या मान्यता असलेल्या दोन संस्थांच्या देखरेखीखाली बसवण्यात येणार आहे. मुंबईतील ओहोटी रेषा आणि भरती रेषा नेमकी कुठली, तसेच सौर दिवे असलेली दिशानिर्देशक यंत्रणा कुठपर्यंत बसवावी, हे या दोन संस्था निश्चित करणार आहेत. या कामासाठी निविदा भरण्याची अंतिम तारीख १६ जून आहे. ही यंत्रणा यंदाच्या गणेशोत्सवापूर्वीच चौपाट्यांवर कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. प्रदूषणमुक्तीसाठी एक महत्त्वाचे पाऊल मुंबई उच्च न्यायालयाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदीचे आदेश दिल्यानंतर, मुंबई महापालिकेकडून त्याची अंमलबजावणी यंदा काटेकोरपणे केली जात आहे.

# शेतकऱ्यांसोबत पक्षपात का?



**अमर हबीब**
आंबाजोगाई, महाराष्ट्र
८४११९०९९०९

**कृषीसंवाद**

डोक्यावर मोबाईलचे टोपले घेऊन मोबाईल घ्या मोबाईल म्हणत गल्लोगल्ली फिरताना तुम्ही अंबानीला कधी पाहिले आहे का? नाही ना? मग शेतकऱ्यांनी आपला माल डोक्यावर घेऊन घरोघरी माल विकायला जाणे आवश्यक आहे का? जशी औद्योगिक उत्पादनाच्या वितरणाची साखळी आहे, तशी शेतीमालाच्या विक्रीची साखळी का नसावी? त्यावर मार्केट कमिट्यांची बंधने का असावी? जशी औद्योगिक उत्पादनावर बंधने नाहीत तशी कृषी उत्पादनांना मोकळीक का नाही? कारखानदार कितीही जमीन बाळगू शकतो. त्यावर सीलिंगचे बंधन नाही. अनेक कारखानदार हज्जारो एकरचे मालक आहेत. शेतकऱ्यांवर मात्र सीलिंगचे बंधन का? या सीलिंगमुळे आज जमिनीचे एवढे लहान लहान तुकडे झाले आहेत की शेतकरी त्या तुकड्यांवर आपली उपजीविकाही भागवू शकत नाही. (सरकारी आकडेवारी नुसार ८५ टक्के शेतकऱ्यांचे होल्डिंग २ एकरच्या आत आले आहे) तुम्हाला हे माहीत आहे का सीलिंगचे बंधन फक्त शेतजमिनीवर आहे म्हणजे शेतकऱ्यांवर आहे. ते बंधन जमिनीवर नाही. कारखानदारांना मोकळीक आणि शेतकऱ्यांवर बंधन, असा हा कायदा आहे. जमीन अधिग्रहण कायद्याचा वापर करून सरकारने हजारो, लाखो एकर जमीन शेतकऱ्यांकडून काढून कारखानदारांना दिली आहे. डावे विचारवंत सीलिंग कायद्याचे समर्थन करताना म्हणतात, सीलिंग उठले तर अदानी अंबानी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतील. पण त्यांना हे दिसत नाही की कारखानदारांना जमिनी घेण्यासाठी सीलिंगचा अडथळा अजिबात नाही. आज कायदा असताना देखील हजारो एकर जमिनी त्यांच्याकडे कशा? असा प्रश्न त्यांना पडत नाही. डाव्यांच्या भाषेत बोलायचे तर आज भांडवलदार जमीनदार बनले आहेत. जमीन अधिग्रहण कायद्याने त्याला मदत केली आहे. मेला तो फक्त शेतकरी! कोणी व्यावसायात उतरत असेल, उद्योग-धंद्यात उतरत असेल तर तो भागीदारी करतो किंवा कंपनी काढतो. त्याची प्रगती कशी होईल असा विचार केला जातो शेती करताना मात्र ना भागीदारी ना कंपनी ! शेतीत फारतर समूह शेती, गट शेती, सहकार शेती ! शेतीत भागेल कसे एवढाच विचार केला जातो. शेतकऱ्यांच्या तथाकथित उत्पादन कंपन्या उत्पादन अजिबात करीत नाहीत. एक पेरणीच्या अगोदरची, दुसरे खळ्यानंतरची कामे ह्या कंपन्या करतात. त्या सुरक्षित राहतात. उत्पादन मात्र ज्या त्या शेतकऱ्याने करायचे. सगळा धोका त्याने पत्करायचा. अशा कंपन्यांना (फार्मर्स प्रोड्युसर कंपनी) म्हणावे का? भारतात शेतकऱ्यांच्या कंपन्या का नाहीत? त्याचे एकमेव कारण सीलिंग कायदा आहे.

शेतकऱ्यांना गळफास ठरलेले

१) कमाल शेतजमीन धारणा (सीलिंग) कायदा,

२) आवश्यक वस्तू कायदा,

३) जमीन अधिग्रहण कायदों आदी

शेतकरीविरोधी कायदे रद्द करा!

*(लेखक किसानपुत्र आंदोलनाचे सक्रीय कार्यकर्ते आहेत)*

# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन

## कॉ. राम बाहेती यांची प्रमुख उपस्थिती

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशन शनिवारी ता. १४ जून अहिल्यानगर शहरात होणार असल्याची माहिती भाकपचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते यांनी दिली. पारिजात चौक, गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात सकाळी १० वाजता या अधिवेशनाचे उद्धाटन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. डॉ. राम बाहेती यांच्या हस्ते होणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे तर भारतीय महिला फेडरेशनच्या राज्याध्यक्ष कॉ. स्मिता पानसरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. उद्धाटन सत्रानंतर जिल्हा सचिव राजकिय व संघटनात्मक अहवाल मांडतील. विविध आघाड्यांचे अहवाल मांडले जातील. त्यावर तालुका परिषदांमधून जिल्हा पक्ष परिषदेसाठी निवडून आलेले प्रतिनिधी चर्चा करणार आहे. परिषदेत पुढील तीन वर्षांसाठी जनतेच्या प्रश्नावर करावयाच्या आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. तसेच तीन वर्षांसाठी नवीन कौन्सिल, कार्यकारिणी व पदाधिकारी निवडले जाणार आहे. नाशिक येथे ता. २२ ते २४ जून रोजी आयोजित राज्य अधिवेशनासाठी प्रतिनिधींची निवड करण्यात येणार आहे. या जिल्हा अधिवेशनात जिल्ह्यातून २५० प्रतिनीधी सहभागी होणार आहे. अधिवेशन परिसराला कॉ. शांताराम वाळुंज नगरी व विचार पीठाला कॉ. दादाभाऊ गायकवाड यांचे नाव देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा सहसचिव कॉ.सुधीर टोकेकर व संतोष खोडदे यांनी दिली. डॉ. राम बाहेती हे सद्य राजकीय व सामाजिक परिस्थितीवर मार्गदर्शन करणार आहे. परिषदेत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवरही चर्चा होणार असून, विविध विषयांवर ठराव केले जाणार आहे. अधिवेशनात शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी, जन विरोधी व घटनाविरोधी विशेष जन सुरक्षा विधेयक, महिला सुरक्षा, स्मार्ट मिटरला विरोध, दलित, आदिवासी व सामाजिक न्याय खात्याचा निधी वळवण्याला विरोध हे विषय केंद्रस्थानी राहणार आहे. तसेच जिल्ह्यातील विकासाच्या दृष्टीने प्रलंबित असलेल्या प्रश्नावर आंदोलनाचा निर्णय घेण्यात येणार आहे.




# अन्याविरोधात ख्रिश्चन धर्मियांची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

**अहमदनगर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ख्रिश्चन मोर्चा संघटनेच्या वतीने ख्रिश्चन धर्मगुरू यांच्यावर होणाऱ्या हल्ल्याच्या संदर्भात व विविध मागण्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन करून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी ख्रिश्चन समाजाचे बिशप तान्हाजी पाडळे, बिशप अशोक पाडळे, राष्ट्रीय ख्रिश्चन मोर्चाचे अध्यक्ष पा. बाळु पाडळे, उपाध्यक्ष सुनील बनसोडे, सेक्रेटरी जोसेफ वैरागर, रा. ख्रि. मो. रेव्ह. जे. आर वाघमारे, विजय काकडे, सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिंदे, आरपीआयचे सुशांत म्हस्के, आशिष सावंत, विजय सावंत, एलीयज पगारे, मार्कस वंजारे, पा. सुनील शिंदे, रवी ठोंबरे आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, ख्रिश्चन बांधवांवर वारंवार अन्याय होत असून चर्च आणि प्रार्थना स्थळावर हल्ले व पोलीस व स्थानिक प्रशासनांची संगनमत करून खोटे गुन्हे दाखल करून निर्दोष लोकांना जेलमध्ये पाठवने तसेच जातपात या आधारावर भेदभाव करून धर्माधर्मात दंगा घडवणे आदिवासी मध्ये घुसखोरी करून धार्मिक व सामाजिक बहिष्कार यासारखे खेळ खेळणे इसाई धर्मावर आस्था व विश्वास असणाऱ्या व्यक्तींच्या मृतदेह सन्मानपूर्वक दफन विधी न करू देणे असे अमानवीय कृत्य केले जात आहे. आमचे मूलनिवासी एस.सी, एस.टी, ओबीसी, पूर्वजांनी नेहमी जातीपाती उच्चनिवृता अस्पृश्यता असमानता व आधारित धर्म व संस्कृतीचा हजारो वर्षापासून झालेला आहे. भारतामध्ये सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा अधिकार संविधानाच्या माध्यमातून मिळाला आहे. त्या अधिकाराला संपवण्याचा उद्देश ठराविक संघटनेद्वारे मूलनिवासी बहुजनांवर धर्म जाती आणि वेगवेगळ्या षडयंत्रांच्या माध्यमातून अन्याय केला जात आहे. भारतातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये धर्मांतर विधेयक पारित करण्यामागे षडयंत्र हे आहे की, भारतातील मूलनिवासी वर काही ठराविक संस्कृती थोपवली जाणे आता भारतातील समस्त मूलनिवासी ख्रिश्चन बांधवांना राष्ट्रीय ख्रिश्चन मोर्चा व भारत मुक्ती मोर्चा या खाली संघटित होऊन अन्याय अत्याचार मौलिक अधिकाराचे होण्याच्या विरोधात आवाज उठविला पाहिजे व मनुवादी संघटनेचे षडयंत्र वैश्विक स्तरावर उघड केले पाहिजे. तसेच न्याय समानता व धर्मनिरपेक्षताची रक्षण करण्यात यावे तसेच कोणतीही घटना घडल्यास त्याची सखोल चौकशी होऊन दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व धार्मिक स्वतंत्रता पळून याचा दुरुपयोग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच राज्य शासनामध्ये धार्मिक समानता व स्वतंत्रता जोपासण्यात यावी व अनुचित जातीच्या ख्रिश्चन आरक्षण च्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टामध्ये जलदगती ने निकाल देण्यात यावा तसेच दुर्घटना घडलेल्या ख्रिश्चन धर्मातील नागरिकांना सुरक्षात्मक कायदा मजबूत करण्यात यावा व आंतरधर्मीय संवाद वाढवण्याच्या उद्देशाने सद्भावना एक राष्ट्रीय मंच विस्थापित करण्यात यावे तसेच राष्ट्रीय आयोगाच्या वतीने तक्रार निवारण केंद्र स्थापित करण्यात यावे अशा विविध मागण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले.

# भारत जिंकायला निघालेल्या संदिप थोरातवर कॅम्प पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

**नगर तालुका । प्रतिनिधी**

सहयाद्री मल्टिसिटी निधीच्या संचालक मंडळावर ता. ९ जून रोजी २०२५ भिंगार पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये भारत जिंकायला निघालेल्या संदिप सुधाकर थोरात याचा पाय आणखीन खोलात गेला आहे. फसवणुकीच्या गुन्ह्यांत संदीप थोरात हे जेलमध्ये आहे.

आरोपी यांनी संगनमत करून त्यांच्या सहयाद्री मल्टिसिटी निधी लिमीटेड, दरेवाडी अहिल्यानगर या वित्तीय संस्थेने जुलै २०२० ते नोव्हेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार यांना सह्याद्री मल्टिसिटी दरेवाडी शाखा या वित्तीय संस्थेबाबत माहिती दिली. संस्थेमध्ये ठेवीदार इतर बँकापेक्षा जास्त व्याजदर देण्यात येतो, असे आमिष दाखवून फिर्यादी व साक्षीदार ठेवीदार यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी व साक्षीदार यांनासुध्दा विश्वासात घेवून त्यांची दिशाभूल करुन आरोपींनी फौजदारी पात्र कट करुन त्यांचे वित्तीय कंपनीमध्ये ९१,९१,६१०/- रुपये ठेवी ठेवण्यास भाग पाडले. फिर्यादी तसेच साक्षीदार यांना ठरविल्याप्रमाणे लाभांश, व्याजदर न देता




मुद्दलपैकी केवळ ३०% रक्कम परतावा करुन उर्वरीत रक्कम ६६,०६,११०/- रुपये परत न करता आरोपींनी फौजदारी पात्र कट करुन फिर्यादी व साक्षीदार यांनी विश्वसाने संस्थेमध्ये ठेवलेल्या रकमेचा अपहार करुन त्यांचा विश्वासघात करुन फसवणूक केली. फिर्यादीवरून दाखल करण्यात आला.

प्रमोद राजेंद्र साठे यांनी फिर्याद दिली असून आरोपी संदिप सुधाकर थोरात सोबत महिला आरोपी, नवनाथ भालसिंग, दिलीप तात्याभाऊ करांडे, ईश्वर मचे, संतोष रोकडे, नवनाथ लांडगे, विश्वास पाटोळे, संजय चिरके, शुभम करपे, पियुष संचेती, सुधाकर शेलार हे सर्वजण सह्याद्री मल्टीसिटी निधी लिमीटेडचे चेअरमन, संचालक, कॅशीअर, संस्थेचे इतर अधिकारी व कर्मचारी आहेत.

# केंद्र व राज्य सरकारचे धोरण भांडवलदारांच्या इशाऱ्यावर चालते– कॉ. ॲड. लांडे

## भाकप कामगार आघाडी त्रैवार्षिक पक्ष परिषद संपन्न

**अहमदनगर ।प्रतिनिधी**

शहरात झालेल्या भाकप कामगार आघाडीच्या त्रैवार्षिक पक्ष परिषदेत नवीन कामगार कायद्यांना विरोध दर्शविण्यात आला. लाल बावटा जनरल कामगार युनियन संलग्न अवतार मेहेर बाबा कामगार युनियन, अरणगाव यांची भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या त्रैवार्षिक पक्ष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर बैठक पार पडली. यामध्ये कामगारांच्या न्याय, हक्कासाठी संघर्ष करण्याचा निर्धार व्यक्त करुन, केंद्र सरकारने भांडवलदारांच्या हितासाठी नव्याने आणलेल्या नवीन कामगार संहिता कायद्याला विरोध दर्शविण्यात आला. या बैठकीत युनियनमध्ये नवीन कार्यकारिणी सदस्यांची व त्रैवार्षिक पक्ष अधिवेशनात सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींची निवड करण्यात आली. बुरुडगाव रोड येथील भाकपच्या पक्ष कार्यालयात कामगारांची बैठक राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी लाल बावटाचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कामगार युनियनचे युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार, सुभाष शिंदे, प्रविण (बबन) भिंगारदिवे, सुनिता जावळे, विजय भोसले, संजय कांबळे, सुनिल दळवी, राधाकिसन कांबळे आदींसह कामगार उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी पेहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात बळी गेलेल्या निष्पाप नागरिकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. या बैठकीत कामगारांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. मेहेर बाबा कामगार युनियनची ३१ मार्च २०२६ रोजी कराराची मुदत संपत असून, नवीन कराराच्या पार्श्वभूमीवर कामगारांना वाढीव पगारवाढ संदर्भात आणि कामगारांना अपेक्षित असलेल्या विविध लाभ संदर्भात चर्चा करण्यात आली. कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, केंद्र व राज्य सरकारचे धोरण भांडवलदाराच्या इशाऱ्यावर चालत असून, सर्वसामान्य कामगारांना त्यांच्या दावणीला बांधण्यात आले आहे. भांडवलदारांचे हित पाहून निर्णय घेतले जात असून, कामगार, कष्टकरी वर्ग देशोधडीस लागला आहे. पक्षाने नेहमीच श्रमिक, कष्टकरी कामगारांचे नेतृत्व केले आहे. त्यांच्या न्याय, हक्कासाठी पक्ष संघर्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले. कॉ. ॲड. सुधीर टोकेकर म्हणाले की, देशांमध्ये कामगारांच्या विरोधात कायदे तयार होत आहे. मोठ्या संघर्षाने तयार केलेले ४४ कायदे बंद करून, चार नवीन कायदे तयार करण्यात आले. या



कायद्यामुळे कामगारांना मिळालेला कवच काढून घेण्यात आला आहे. या नवीन कायद्याने कर्मचारी यांना कायम होणे अवघड होणार आहे.

पाच वर्षे त्याला कंत्राटीमध्ये घेतलं, तर पाच वर्षाच्या आत किंवा नंतरही त्याला कधीही काढू शकतात आणि त्याला कायम दर्जा मिळू शकत नाही. संप करण्यावर सुद्धा मोठे बंधन कायद्याने घातले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत नवीन कामगार कायदे रद्द होण्यासाठी ७ जुलै रोजी होणाऱ्या देशव्यापी जेल भरो आंदोलनात मोठ्या संख्येने कामगारांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. कामगारांना किमान वेतन २६ ते ३० हजार देण्यात यावे, त्याचप्रमाणे कामगारांना किमान पाच हजार रुपये पेन्शन देण्यात यावी, कामगारांना घरकुल देण्यात यावे, वाढती महागाई कमी व्हावी या मागणीसाठी आयटक व भाकप संयुक्तपणे लढा करणार असल्याचा ठराव घेण्यात आला. शहरात १४ जून रोजी होणाऱ्या भाकपच्या त्रैवार्षिक अधिवेशनात सर्व कामगारांच्या वतीने सहभागी होणाऱ्या शिष्टमंडळाची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये जिल्हा सेक्रेटरी ॲड. कॉ. सुधीर टोकेकर, सहसेक्रेटरी कॉ. सतीश पवार, कार्यकारणी सदस्य कन्हैया बुंदेले, सुभाष शिंदे, मारुती सावंत, राजेंद्र पळसकर, देविदास साळवे, मारुती दहिफळे, वसंत दहिफळे, रामभाऊ कल्हापूरे, राजेंद्र मोरे, दिगंबर माने यांचा समावेश आहे. तसेच यावेळी अवतार मेहेर बाबा कामगार युनियनच्या कार्यकारिणीत चंद्रकला देशमुख, रामभाऊ कल्हापूरे, श्रीनाथ पाटोळे, गणेश गहिले, राजेंद्र मोरे, दिगंबर मोरे यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीसाठी सूचक प्रवीण भिंगारदिवे व अनुमोदक देविदास ससाने हे होते. सर्वांच्या सहमतीने ही नियुक्ती करण्यात आली.

# आरएसपी अधिकारी संदीप गोसावी यांचे यश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य गृह विभाग, पोलीस व शिक्षण विभागाच्या अंतर्गत, तसेच महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संघटन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ता. २१ मे ते ३० मे २०२५ दरम्यान पोलीस मुख्यालय, अहमदनगर येथे आरएसपी (RSP) शिक्षक अधिकारी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात राज्यभरातून एकूण ९० शिक्षक अधिकारी सहभागी झाले होते. या प्रशिक्षणासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या केशव गोविंद विद्यालयाचे ज्येष्ठ व उपक्रमशील शिक्षक संदीप गोसावी यांची निवड करण्यात आली होती. प्रशिक्षणात ड्रील, वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, अग्निशमन सेवा, प्राथमिक उपचार, आकस्मिक सेवा आणि शिस्त या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता. या सर्व विषयांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवण्यात आली आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद कसा द्यावा व हानी कशी टाळता येईल, याचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या अखेरीस या



विषयांवर लेखी परीक्षा घेण्यात आली. शेवटच्या दिवशी पार पडलेल्या पासिंग आऊट परेडमध्ये मान्यवरांना सलामी देण्यात आली. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल संदीप गोसावी यांचा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, संघटनेचे अध्यक्ष संजय शेंडे, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष सुनील पंडित, तसेच नाशिक विभागाचे समादेशक सिकंदर शेख यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले, उपजिल्हा समादेशक प्रकाश मींड, नगर तालुका समादेशक राजीव धस आणि राहुरी तालुका समादेशक राहुल जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. ड्रील इन्स्ट्रक्टर म्हणून मुसा सय्यद यांनी आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या राणी साळवे, पर्यवेक्षक श्रीनिवास खर्डे व शिक्षक प्रतिनिधी उदय गायकवाड यांनी गोसावी यांचे विशेष कौतुक केले. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आरएसपी अधिकारी होण्याचा मान मिळवणारे संदीप गोसावी हे पहिलेच शिक्षक अधिकारी ठरले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून, संस्थेच्या सर्व संचालक मंडळाने त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
– संपर्क –
८८८८३४७४११

**निसार Art**
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# शैक्षणिक दाखल्यांचे वितरण तात्काळ करा- तहसीलदार सावंत

**कोपरगाव । किसन पवार**

तहसील कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून चोवीस तासाच्या आत विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणाऱ्या दाखल्यांचे वितरण करण्याच्या सूचना तहसीलदार महेश सावंत यांनी नुकत्याच कोपरगाव तालुक्यातील सेतू चालकांना एका बैठकीत दिल्या आहेत.



**कोपरगाव शहरातील विविध बँकेसह जवळपास दहा आधार केंद्रे कार्यरत असताना यातील जवळपास आठ आधार केंद्रे बंद पडली असून केवळ दोन आधार केंद्रे सुरू असल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे.त्यामुळे नागरिकांची मोठी कुचंबणा होत आहे.यावर तहसीलदार महेश सावंत यांनी स्वतंत्र बैठक लावणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.**

राज्याच्या महसूल मंत्र्यांनी नागरिकांना महसुल विभागाने आपल्या सर्व सेवा ऑनलाईन द्याव्यां असे निर्देश दिले असताना नगर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करून आपल्या विभागांतर्गत सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध करून द्याव्यात,असे निर्देश अहील्यानगर येथील जिल्हाधिकाऱ्यांनी नुकतेच दिले आहे.या पार्श्वभूमीवर कोपरगाव महसूल विभागाची बैठक नुकतीच तहसील कार्यालयात आयोजित केली होती.

त्यावेळी हे निर्देश दिले आहे. त्यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,''कोपरगांव तालुक्यातील अर्जदारांना दाखल्यासंदर्भात कुठलाही त्रास होता कामा नये,सर्व सेतूकेंद्र चालकांनी प्रमाणपत्रांसाठीची फी दर्शविणार फलक दर्शनी भागात लावावेत,लवकरच तालुक्यातील सर्व सेतूच्या कामकाजाची तपासणी करणार असल्याचे जाहीर करताना त्यांनी सेतूकेंद्रात अर्ज दाखल झाल्यावर त्याच दिवशी तो ऑनलाईन पोर्टलला अपलोड झालाच पाहिजे अशा कडक सूचना दिल्या आहेत. सदर प्रसंगी बहुसंख्येने सेतूचालक उपस्थित होते.

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी

### सरसकट पंचनाम्याचे पालकमंत्री विखे यांचे आदेश



**राहाता । प्रतिनिधी**

तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी, ममदापूर, तिसगाव वाडी, अस्तगाव या भागांत चक्रीवादळासारख्या पावसामुळे डाळिंब, आंबा, ऊस, कांदा, घरे, गोठे यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत, अशी सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची त्यांनी ग्वाही दिली. विखे पाटील यांनी नुकसानीच्या भागाची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला.

पाहणीवेळी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, तहसीलदार अमोल मोरे, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, वीज वितरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ते म्हणाले, नुकसानीच्या पार्श्वभूमीवर स्थायी आदेशाच्या पलिकडे जाऊन मदतीचा विचार करावा लागेल. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

शनिवार, ७ जून रोजी वादळामुळे मोठ्या प्रमाणात शेती आणि फळबागांचे नुकसान झाले. भाऊसाहेब विनायक म्हस्के यांची कांदा चाळ, राहुल सुरेश कसाब यांची डाळिंब बाग, आणि डॉ. बी. टी. गोरे यांची डाळिंब बाग या ठिकाणी जाऊन पाहणी करण्यात आली. विखे पाटील यांनी डाळिंब उत्पादकांशी संवाद साधताना नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापराचे कौतुक केले. राहुल कसाब यांच्या पूर्णपणे जमीनदोस्त झालेल्या बागेच्या पुनर्बांधणीसाठी डॉ. गोरे यांच्या मार्गदर्शनाने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. कांदा चाळीवर पडलेल्या झाडांमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. भविष्यातील नुकसानीपासून बचावासाठी उपाययोजनांची आखणी करण्यावरही त्यांनी भर दिला.

## झेडपी सीईओ आनंद भंडारी यांचे सहकुटूंब शनीदर्शन

### कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शनिशिंगणापूर येथे पाहणी



**नेवासा । विजय खंडागळे**

जिल्हा परिषद आहिल्यानगरचे नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी सह कुटुंब शनीदर्शन घेतले.

उदासी महाराज मठात जाऊन शनिदेवाची पूजा केली, तेलाभिषेक करत शनिदेवापुढे नतमस्तक होऊन आशीर्वाद घेतला. यावेळी नाशिक येथे होणाऱ्या २०२७-२८ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांना पायाभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शनिशिंगणापूर येथे पाहणी करून बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी शनिशिंगणापूर येथे दिली.

या कालावधीत २२ महिने चालणाऱ्या कुंभमेळ्यासाठी शिर्डी व शनिशिंगणापूर येथे मोठ्या प्रमाणात भाविक दाखल होणार आहेत. या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, घनकचरा व्यवस्थापन, पथदिवे, देवस्थानाशी जोडणारे रस्ते, साफसफाई आदी पायाभूत सुविधांबाबत बैठक घेऊन शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याचे भंडारी यांनी स्पष्ट केले. देवस्थानच्या वतीने राज्यपाल प्राप्त पुरस्कार विजेते ॲड. सयाराम बानकर यांनी पुष्पगुच्छ, शाल व शनीप्रसाद देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच शनिशिंगणापूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी दादासाहेब बोरुडे यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत केले. या दौऱ्यात ग्रामपंचायतीच्या उत्पन्नवाढीबाबत, पथकर वसुली व ग्रामपंचायतच्या आर्थिक आढाव्याबाबतही चर्चा करण्यात आली.

## बनावट पावती घोटाळाही उघडकीस आणणार- संभाजी माळवदे

### बनावट ॲप घोटाळ्यातील कारवाईसाठी धरणे आंदोलन

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील देवस्थानातील बनावट ॲप घोटाळ्याची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी काँग्रेस आणि विविध संघटनांनी शनिशिंगणापूर देवस्थान मंदिर परिसरात धरणे आंदोलन केले. देवस्थानच्या अधिकृत ॲपऐवजी काही कर्मचाऱ्यांनी व पुजाऱ्यांनी बनावट ॲप तयार करून ऑनलाइन पूजेच्या माध्यमातून, तसेच बनावट देणगी पावत्यांद्वारे आणि बनावट कोड वापरून कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला. या गैरव्यवहारातून निधी थेट त्यांच्या खाजगी खात्यांमध्ये वळवण्यात आला. यामुळे देवस्थान व देशभरातील भक्तांची फसवणूक झाली आहे. या प्रकाराबाबत काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी



अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी केली होती. तसेच, देवस्थान प्रशासनाकडून अधिकृत ॲपबाबतची माहिती जसे की धर्मदाय आयुक्तांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव आणि ॲप संदर्भातील करारनामा मागवण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने ही माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळेच देवस्थान प्रशासनाकडून काही अपारदर्शक ॲप्सची माहिती दडवून ठेवली जात असल्याचा आरोप करत आज आंदोलन करण्यात आले. धरणे आंदोलनादरम्यान संभाजी माळवदे यांनी सांगितले की, प्रशासनाने फक्त तीन ॲपवरच कारवाईसाठी मागणी करून उर्वरित ॲप्स आणि बनावट पावत्यांचे पुस्तक तयार करणाऱ्यांना पाठीशी घातले आहे, हे दुर्दैवी आहे. या घोटाळ्याची सखोल चौकशी होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी या घोटाळ्यात देवस्थानचे कर्मचारी, पुजारी व काही अधिकारी सहभागी असल्याचा आरोप केला. त्यांनी भाविकांच्या श्रद्धेचा घात झाल्याचे म्हटले. तर हरीश चक्रनारायण यांनी देवस्थान आता सरकारच्या ताब्यात देण्याची गरज आहे, असा सूर आळवला. त्यांनी प्रशासक नेमल्याशिवाय भ्रष्टाचार थांबणार नसल्याचे स्पष्ट केले. या आंदोलनात काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, महिला अध्यक्ष शोभा पातारे, स्वाभिमानी संघटनेचे गणपत मोरे, बहुजन वंचित आघाडीचे विजयसिंह गायकवाड, संजय वाघमारे यांच्यासह इतर वक्त्यांनी मनोगत व्यक्त केले. आंदोलनात संजय होडगर, कानिफ जगताप, सुमित पातारे, संदीप मोटे, सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे आणि अनेक शनिभक्त सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना निवेदन देण्यात आले असून, पुढील आठ दिवसांत योग्य तपास न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



## आश्वासनानंतर आदिवासी भटक्या विमुक्तांचे आंदोलन स्थगित

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

लिंपणगाव (श्रीगोंदा) येथील जोशी वस्तीवरील गट क्र. ५२/५२ आणि नवीन गट क्र. २/१/५२ वर अतिक्रमित घरे असलेल्या आदिवासी भटके विमुक्त समाजाने त्यांच्या घरांच्या नियमितीकरणासाठी व जातीच्या दाखल्यांसाठी तहसील कार्यालयावर आंदोलन केले. या आंदोलनानंतर श्रीगोंद्याचे तहसीलदार मुद्गुल यांनी १२ जून रोजी गटविकास अधिकारी व शक्ती प्रादत्त समितीची बैठक घेण्याचे तसेच १५ दिवसांत दाखले मिळवण्यासाठी कॅम्प आयोजित करण्याचे लेखी आश्वासन दिले. या आंदोलनाचे नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ॲड. डॉ. अरुण जाधव यांनी केले. यावेळी लता सावंत, पल्लवी शेलार, उमाताई जाधव, बापू ओहोळ, तुकाराम पवार, विशाल पवार, आसाराम काळे, संतोष चव्हाण, राहुल पवार, सचिन चव्हाण, आतिश पारवे, राजू शिंदे, ललिता पवार, रेशमा बागवान, शितल काळे, काजोरी पवार, डीसेना पवार, ऋषिकेश पवार, अशोक मोरे, सागर शिंदे, मच्छिंद्र जाधव, अविनाश काळे आदी उपस्थित होते. शिवसेना (शिंदे गट) महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख मीराताई शिंदे, तालुका प्रमुख नंदू गाडे, तसेच शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अनिल घनवट यांनीही आंदोलनास पाठिंबा दिला. ढोल, ताशा, हलगी, डफ, तुणतुणे अशा पारंपरिक वाद्यांच्या गजरात सुरू झालेल्या या आंदोलनात घोषणांनी परिसर दणाणून गेला. भाषणे लता सावंत, तुकाराम पवार, अनिल घनवट, रूपचंद सावंत, संजय सावंत, अरविंद कापसे, मीराबाई शिंदे यांनी केली. बापू ओहोळ यांनी प्रास्ताविक, संतोष चव्हाण यांनी सूत्रसंचालन, तर पल्लवी शेलार यांनी आभार प्रदर्शन केले.

## डॉ.सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत गारुडकर तालुक्यात प्रथम

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



जनसेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ.सी व्ही रमण बालवैज्ञानिक परीक्षेत ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे, श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय येथे शिकत असलेली इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी कु. पूर्वी संजय गारुडकर ही श्रीगोंदा तालुक्यात प्रथम आली असून तिची इस्रो सहलीसाठी निवड झाली आहे. श्रीगोंदा माध्यमिक विद्यालयातील आठ विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. पूर्वीच्या या यशाबद्दल ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे सचिव राजेंद्र नागवडे तसेच संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा राजेंद्र नागवडे, संस्थेचे निरीक्षक बी.के लगड, छत्रपती शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिन लगड,ऑडिटर सुभाष भापकर, विलास ठाणगे, शाळा समितीचे उपाध्यक्ष बबन आनंदकर, शाळा समितीचे सर्व सदस्य, विद्यालयाचे मुख्याध्यापक भिमराव आनंदकर,मार्गदर्शक शिक्षक राजेंद्र गारुडकर, सर्व शिक्षक व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मुळे विद्यालयाच्या आदिती देवकरची इस्त्रोसाठी निवड

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**



आंबी येथील गुरुदेव दत्त एज्युकेशन सोसायटी सावरगाव संचलित कै. अनिल दिगंबर मुळे विद्यालयाची पाचवीची विद्यार्थिनी आदिती राहुल देवकर हिने अवकाश संशोधन क्षेत्रातील डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत तालुक्यात पाचवा क्रमांक मिळविला. यामुळे भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) च्या सहलीसाठी आदितीची निवड झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत आदिती बरोबरच निवडक विद्यार्थ्यांना इस्रोच्या शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची, कार्यशाळेत सहभागी होण्याची आणि अवकाश संशोधनाच्या मूलभूत संकल्पना समजावून घेण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर आदितीने मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत ३०० पैकी २३२ गुण मिळवून तालुक्यात दुसरा क्रमांक, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी १९८ गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे.

आदितीने या निवड प्रक्रियेत आपली बुद्धिमत्ता आणि उत्साहाने सर्वांना प्रभावित केले आहे. आदिती देवकरच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय (बापू) कुलकर्णी, सचिव सुनीताताई संजय कुलकर्णी, उपाध्यक्ष संतोष कावले, संचालक मधुकर मेहेत्रे, मुख्याध्यापिका देठे यांसह सर्व शिक्षक वृंद, संस्था पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# जागतिक नेत्रदान दिन

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशीवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते. जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे. भारतामध्ये असलेल्या कायद्यानुसार नेत्रदान हे मरणोत्तर करावे. हे नेत्रदान चष्मा असणारे, मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेले तसेच मधुमेह आणि मानसिक त्रास असलेले व्यक्तीही करू शकतात. नेत्रदान करण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तींनी जवळच्या नेत्रपेढीत जाऊन नेत्रदानाची नोंद करावी. मृत व्यक्तीने नेत्रदानाची नोंद केली नसली तरी त्या व्यक्तीच्या वारसदारांनी इच्छा व्यक्त केली तरी त्या व्यक्तीचे नेत्रदान होऊ शकते. मृत्यूनंतर जास्तीतजास्त सहा तासाच्या आत नेत्रदान होऊ शकते. ज्या व्यक्तीला नेत्रदानासाठी कॉर्नियाचा वापर करायचा आहे त्याला चोवीस तासाच्या आत कॉर्नियाचे प्रत्यारोपण करणे गरजेचे असते. नेत्रदानाचा अर्थ शरीरातून संपूर्ण डोळा काढून घेणे असा होत नाही. यात मृत व्यक्तीच्या डोळ्याचा कॉर्नियाचा वापर करण्यात येतो. एका मृत्यू झालेल्या व्यक्तीचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.





**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# सुनियोजित विकासासाठी प्रशासन कटिबद्ध- आयुक्त शेखरसिंह

## विधी विद्यार्थ्यांनी घेतली आयुक्तांची शाळा

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

पिंपरी - चिंचवड शहराच्या सुनियोजित विकासासाठी प्रशासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका मुख्य प्रशासकीय इमारत सभागृह, पिंपरी येथे सोमवारी ता.९ जून रोजी दिली.



दर्द से हम दर्द तक ट्रस्ट आणि विधी सेवा प्राधिकरण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महाराष्ट्र महानगरपालिका कायद्याच्या तरतुदी आणि अंमलबजावणी या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानातून शेखर सिंह यांनी संपूर्ण महाराष्टातील प्रमुख विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि नवोदित वकील यांच्याशी सुसंवाद साधला. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्मिक आणि बेधडक प्रश्न विचारून आयुक्त शेखर सिंह यांची शाळा घेतली; परंतु शेखर सिंह यांनी प्रत्येक प्रश्नाला समाधानकारक उत्तर दिले. विधी सेवा प्राधिकरण पुणे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, सचिव सोनल पाटील यांचे मार्गदर्शनाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी उद्योगपती बधुवेल बलिद, दर्द से हम दर्द तक ट्रस्टचे ॲड. सतिश गोरडे, ॲड. हिमांशु माने यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेतील जनतेच्या तक्रारींवर कसे लक्ष ठेवले जाते आणि प्रत्येक समस्या कशा पद्धतीने सोडविली जाते याविषयी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना शेखर सिंह यांनी सविस्तर उत्तर देताना पिंपरी - चिंचवड महानगरपालिका सारथीसारख्या तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करून जनतेने पाठविलेल्या प्रत्येक तक्रारीची वर्गवारी करून दखल घेते.

पाणीपुरवठा, स्वच्छता आणि साफसफाई यासारख्या मूलभूत सुविधांचा प्राधान्याने निपटारा केला जातो. ज्या समस्या प्रलंबित आहेत त्यांचा विभागनिहाय पाठपुरावा केला जातो. याबाबत अधिकाऱ्यांच्या कामगिरीनुसार आणि केलेल्या उपाययोजनांबाबत पाच गुण कमी केले जातात. त्यामुळे प्रशासकीय वचक राहतो आणि समस्या दीर्घकाळ प्रलंबित राहत नाहीत, अशी माहिती शेखर सिंह यांनी दिली. कार्यक्रमाच्या संयोजनात ॲड. खेताराम सोळंकी, ॲड. सोहम यादव, ॲड. संकेत राव, ॲड. महेश सोनवणे, ॲड. हृषीकेश शर्मा यांनी सहकार्य केले. अनुष्का शिंदे यांनी सूत्रसंचालन व हरदित सिंग यांनी आभार मानले.

# राजेंद्र कोंढरे यांना 'छत्रपती शिवाजी महाराज जीवनगौरव पुरस्कार' जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना फाउंडेशनच्या भारत क्रांती मिशन तर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या निस्वार्थ आणि प्रभावी योगदानासाठी देण्यात येत असून, समाजहितासाठी त्यांनी घेतलेले पुढाकार, उभारलेली चळवळ आणि हजारो लोकांच्या जीवनात घडवलेले सकारात्मक परिवर्तन याची प्रचिती या सन्मानाने अधोरेखित होते.



राजेंद्र कोंढरे यांनी मराठा महासंघाच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय आणि युवांचा सशक्तीकरण यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. समाजप्रबोधन, संघटन आणि नेतृत्व यामध्ये त्यांनी दिलेला सक्रिय सहभाग समाजासाठी आदर्शवत ठरला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार ता. २२ जून २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान केला जाणार आहे.

या पुरस्काराचे नावच छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी संबंधित असल्याने, हे सन्मानाचे द्योतक अधिकच ऐतिहासिक आणि प्रेरणादायी मानले जात आहे. राजेंद्र कोंढरे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे

### डॉ. आंबेडकर नॅशनल हिस्ट्री असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष

# प्रो.डॉ.वाघ यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' समाजभूषण पुरस्कार जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दिला जाणारा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण राज्यस्तरीय पुरस्कार" यंदा डॉ. संदेश वाघ यांना जाहीर करण्यात आला आहे. आंबेडकरवादी चळवळीतील त्याच्या मोलाच्या योगदानाबद्दल हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्कारामध्ये ₹७५,००० रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र यांचा समावेश आहे. या पुरस्कारामुळे ते काही शासकीय सवलतीसही पात्र ठरणार आहेत. डॉ. वाघ हे कर्मवीर दादासाहेब वाघ व शांताबाई वाघ यांचे सुपुत्र असून, त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती व



अनुसूचित जमाती आयोगावर सदस्य सचिव म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सध्या ते मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागात प्राध्यापक आहेत. डॉ. वाघ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बौद्ध धम्म, आणि इतिहास विषयावर इंग्रजी, मराठी आणि हिंदी या भाषांमध्ये अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांनी फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, मलेशिया, सिंगापूर, मॉरिशस, नेपाळ, थायलंड, इंडोनेशिया, श्रीलंका आदी देशांमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आयोजन व प्रतिनिधीत्व केले आहे. ते भारत सरकारच्या (आय. सी.एच. आर.) संस्थेच्या पश्चिम भारताचे समन्वयक म्हणूनही कार्यरत होते. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आंतरजातीय विवाह कायदा मसुदा समिती, आकस्मिकता योजना समिती आणि महात्मा फुले लेखन प्रकाशन समितीवर त्यांनी सदस्य म्हणून योगदान दिले आहे. राज्य शासनाकडून पुरस्कार जाहीर करून डॉ. वाघ यांचा गौरव करण्यात आल्याने सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



# इंद्रायणीच्या साक्षीने कृष्णार्पणचे प्रकाशन

**पिंपरी । प्रदीप गांधलीकर**

जगद्गुरू तुकोबांचे अभंग तारणाऱ्या इंद्रायणीच्या साक्षीने ज्येष्ठ कवी सुरेश कंक लिखित कृष्णार्पण या कवितासंग्रहाचे प्रकाशन आनंद डोह, गाथामंदिराजवळ, देहू येथे रविवारी ता.८ जून रोजी संपन्न झाले. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे अशा पारंपरिक प्रकाशन पद्धतीला छेद देऊन सर्व उपस्थित साहित्यिक हेच अध्यक्ष आणि हेच प्रमुख पाहुणे समजून सर्वांच्या सन्माननीय उपस्थितीत साहित्यविश्वातील हा आगळावेगळा प्रकाशन समारंभ अभिनव पद्धतीने साजरा करण्यात आला.

प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे, राजेंद्र घावटे, प्रदीप गांधलीकर, नारायण कुंभार यांनी मनोगतातून कृष्णार्पण या संग्रहातील कवितांची तसेच सुरेश कंक यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची आस्वादक समीक्षा केली. सुहास घुमरे, राधाबाई वाघमारे, हेमंत जोशी, मेहमुदा शेख, आनंद मुळूक, कल्पना बंब, पीतांबर लोहार यांनी आध्यात्मिक विषयांवरील कवितांचे प्रभावी सादरीकरण करीत भक्तिरसाचा परिपोष केला.

प्रकाशिका शामला पंडित यांनी स्वागत केले. कवी सुरेश कंक यांनी मनोगतातून, वडिलांनी दिलेल्या रोजनिशीत मी कविता स्फुरली की लिहून ठेवीत असे. यथावकाश रोजनिशी जीर्ण झाली; परंतु आजतागायत त्यातून जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर तीन कवितासंग्रहांची निर्मिती झाली आहे. साहित्य क्षेत्रातील कालबाह्य रूढी - परंपरा यांना फाटा देत प्रत्येक साहित्यिक हा मान्यवर असतो या भावनेतून आजचा सोहळा आयोजित केला आहे! अशी भावना व्यक्त केली. याप्रसंगी सर्व उपस्थितांना सहभागी करून घेत इंद्रायणी नदीच्या जलाशयातील नावेत तसेच आनंद डोहाच्या काठावर कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

त्यामध्ये संत तुकाराम महाराजांच्या वेषभूषेतील प्रकाश घोरपडे, कैलास भैरट, पांडुरंग सुतार, उमेंद्र बिसेन, बळीराम शेवते, विवेक कुलकर्णी, अर्जुन चौधरी, सुनीता घोडके, अरुण घोडके, गजानन टाक, राधाकिसन दराडे, श्रीकांत दराडे, ऋतुजा दराडे, भाऊसाहेब गायकवाड, प्रकाश रसाळ, मच्छिंद्र जुरांगे यांना सहभागी करून घेण्यात आले. कार्यक्रमाच्या संयोजनात अशोकमहाराज गोरे, मुरलीधर दळवी, अरुण परदेशी, जयश्री गुमास्ते, शरद काणेकर, शामराव सरकाळे, फुलवती जगताप यांनी परिश्रम घेतले. सुभाष चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. तानाजी एकोंडे यांनी आभार मानले. भैरवी गायनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मोदी सरकारच्या ११ व्या यशस्वी वर्षांचा नगरमध्ये उत्सव

## केंद्र शासनाच्या योजनांचा गावागावात प्रचार करण्याचा निर्धार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

"संकल्पातून सिद्धीपर्यंत" या घोषवाक्याशी सुसंगत पद्धतीने देशात विकासाचे नवीन पर्व घडविणाऱ्या मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळाचा गौरव नगरमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यांची विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला उत्तर विभागाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दक्षिण विभागाचे दिलीप भालसिंग, शहर अध्यक्ष अनिल मोहीते, तसेच नवनियुक्त मंडलाध्यक्ष, आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात "एक पेड माँ के नाम" या भावनिक उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला, तसेच केंद्र सरकारच्या विविध योजनांवरील माहितीपर प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.



'संकल्प ते सिद्धीपर्यंत' या सूत्राधारे देशभर राबविण्यात आलेल्या योजनांची सविस्तर माहिती आणि त्यांचे परिणाम यांचे सादरीकरण या कार्यशाळेत करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने ग्रामीण विकास, शेती, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता, तंत्रज्ञान व महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत ऐतिहासिक प्रगती साधल्याचा विश्वास यावेळी वक्त्यांनी व्यक्त केला. या यशोगाथा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी नगरमधील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रत्येक गावात आणि घराघरात जाऊन केंद्र सरकारच्या योजनांची माहिती पोहोचवण्याचा निर्धार केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी चा संकल्प पुन्हा एकदा दृढ करत, "मोदी है तो मुमकिन है" असा जयघोष दिला.